महासागर

मंगळवार, दि. 29 ऑक्टोंबर 2024

# अमरावती

पान 3

# ....अखेर वरुडमध्ये फाटली महायुती!

■ भाजपकडून उमेश यावलकर, तर राष्ट्रवादीकडून आ.भूयार यांना उमेदवारी

■ महाविकास आघाडी अपक्षाला समर्थन देण्याच्या मूड मध्ये

महासागर प्रतिनिधी

**अमरावती/वरुड, (दि.28)-** मोर्शी-वरुड विधानसभा मतदारसंघात महायुतीमध्येच सुरु असलेल्या ओढताणीचे आज परिणाम समोर आले. जिल्ह्यात इतर ठिकाणी एकत्र लढत असलेल्या महायुतीमधील भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष(अ.प.गट) मोर्शी मतदारसंघात एकमेकांच्या विरोधात लढणार आहे. दुसरीकडे महाविकास आघाडी ही पुन्हा एकदा अपक्षावर डाव खेळण्याच्या मूड मध्ये दिसत आहे. त्यामूळे अद्यापपर्यंत आपल्या उमेदवाराची घोषणा मविआ कडून करण्यात आली नसल्याचे दिसत आहे.

मोर्शी-वरुड मतदारसंघ हा राजकीय दृष्टीने संवेदनशील समजल्या जातो. पक्षांच्या एकजुटीने प्रस्थापितांना धूळ चारल्याचा या मतदारसंघाचा इतिहास आहे, असे असताना महायूतीचा उमेदवार येथे सरस



ठरेल अशी आशंका व्यक्त केली जात होती. कारण लोकसभा निवडणूकीमध्ये या मतदारसंघातून महायुतीला विशेषत: भाजपला लक्षणीय मतांची लीड मिळाली होती. याच लीडवर डोळा ठेवून विद्यमान आमदार देवेंद्र भूयार पुन्हा एकदा आमदार होण्याचे स्वप्न रंगवित असताना, भाजपचे खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी भूयारांची झोप मोडून त्यांचे स्वप्न भंग केले.

त्यांच्यासमोर भाजपकडून उमेश यावलकर नावाची बलाढ्य उमेदवारी उभी केली.



दुसरीकडे राष्ट्रवादी दादानेही आपला शब्द पाळत आ.भूयारांच्या हाताला घड्याळ बांधली. गेल्या विधानसभा निवडणूकीमध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटनेवर उभे असलेले भूयार यांना तेव्हांच्या काँग्रेस, राष्ट्रवादीच्या आघाडीने समर्थन देवून त्यांना आमदार केले. परंतू त्या आघाडीला त्याची किंमतही चुकवावी लागली. यंदा मात्र महाविकास आघाडीतून शरद पवार यांच्या राष्ट्रवादी सुटणाऱ्या मोर्शी मतदारसंघाच्या जागेवर अजूनही कोणत्याच उमेदवाराची घोषणा झालेली दिसत नाही, त्यामूळे पुन्हा एकदा आघाडी अपक्षावर डाव लावते की, काय? असे दिसत आहे. दुसरीकडे भूयांरी बांधलेल्या घड्याळीचे काटे किती वेगवान ठरतील हा येणारा काळच ठरवेल.

# डॉ.सुनिल देशमुख आज दाखल करणार उमेदवारी

■ धर्मदाय कॉटन फंड येथून होणार निवडणूकीचा ऐल्गार

■ मविआची भव्य दुचाकी रॅली घालणार मुख्य शहराला प्रदक्षिणा

महासागर प्रतिनिधी

**अमरावती, (दि.28)-** महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ.सुनील देशमुख उद्या मंगळवारी(दि.29) काँग्रेस पक्षाकडून निवडणूक आयोगाकडे आपला उमेदवारी अर्ज (नामांकन) दाखल करणार आहे. आतापर्यंत गृहभेटीतून आपला प्रचार सुरु ठेवणारे डॉ.सुनिल देशमुख धर्मदाय कॉटन फंड येथून निघणाऱ्या दुचाकी रॅलीतून यंदाच्या विधानसभा निवडणूकीचा ऐल्गार करणार आहे. रॅली इंडिया आघाडी, महाविकास



आघाडीच्या सर्व प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीमध्ये ही रॅली सकाळी 9:30 वाजता धर्मदाय कॉटन फंड वालकट कंपाऊंड येथून निघाणार आहे. धर्मदाय कॉटन फंड, चौधरी चौक, कॉटन मार्केट, चित्रा चौक, प्रभात चौक, सरोज चौक, श्याम चौक , जयस्तंभ चौक, मालविय चौक ते इर्विन चौक येथील प्रचार कार्यालय ते तहसिल कार्यालय असा या रॅलीचा मार्ग राहणार आहे.

सर्व प्रमुख नेत्यांच्या उपस्थित डॉ.सुनिल देशमुख आपला उमेदवारी अर्ज दाखल करतील. सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व अमरावतीकर जनतेने रॅलीमध्ये सहभागी होण्याचे आवाहन अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटी अध्यक्ष बबलु शेखावत यांनी केले आहे.

# सणउत्सव कालावधीत कलम 36 अन्वये आदेश जारी

महासागर प्रतिनिधी

**अमरावती,(दि.28) -** जिल्ह्यात आगामी काळात सण उत्सव साजरा होणार आहे. तसेच नामांकन पत्र दाखल करण्याचा शेवटचा दिवस असल्याने त्यादिवशी मोठ्या प्रमाणात उमेदवार नामांकन पत्र दाखल करणार आहेत. सभांचे आयोजन व शक्तीप्रदर्शन करण्यासाठी मिरवणूक काढण्यात येतात व विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता लागू करण्यात आली आहेत. या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम 36 अन्वये सर्व पोलीस आयुक्तालयाच्या परिसरातील सर्व पोलिस ठाणेदार, अंमलदार व त्यांच्यावरील अधिकाऱ्यांना दि. 29 ऑक्टोबर ते 12 नोव्हेंबर 2024 च्या मध्यरात्रीपर्यंत अधिकार प्रदान करण्याचे आदेश पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी निर्गमित केले आहे.

रस्त्यावरून जाणारी मिरवणूक सुरळीत ठेवणे, उपासनास्थळी गर्दी होणार असेल किंवा अडथळ्याचा संभव असेल तर अडथळा होऊ न देणे, सर्व मिरवणूकाच्या व जमावाच्या प्रसंगी व पूजा-अर्चा या ठिकाणी कोणताही रस्ता किंवा अडथळा संभव असेल अशा सर्व बाबतीत अडथळा न होवू देण्यासाठी याठिकाणी बंदोबस्त ठेवणे, सर्व रस्त्यांवर किंवा रस्त्यात, सर्व धाब्यावर आणि सार्वजनिक ठिकाणच्या कपडे धुण्याचा व उतरविण्याचा जागेच्या ठिकाणी व इतर सर्व सार्वजनिक किंवा लोकांच्या येण्याच्या जागेमध्ये बंदोबस्त राहण्यासाठी, वाद्यांबाबत नियम व नियंत्रण ठेवणे, सार्वजनिक जागेत ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत नियम व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. सक्षम अधिका-यांनी या अधिनियमाच्या कलम 33, 35, 37 ते 40, 44 व 45 अन्वये कार्यवाही करावी, असे पोलीस आयुक्त यांच्या आदेशात नमूद केले आहे.

# पतीने केली पत्नीला मारहाण

**अमरावती -** गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणार्या एका महिलेला तिच्या पतीचे अनैतिक संबंधाच्या कारणावरून मारहाण केली. पतीचे अनैतिक संबंध असल्याचा हा प्रकार पत्नीला समजला होता. त्यानंतर ती पतीच्या मैत्रिणीला समजावून सांगण्यासाठी गेली. त्यावेळी हा प्रकार पतीला समजताच त्याने पत्नीला शिवीगाळ करून मारहाण केली. पत्नीच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# जिल्ह्यात आज 77 उमेदवाराचे नामांकन अर्ज दाखल

महासागर प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 28)-** विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज 77 उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले. धामणगाव रेल्वे - 9, बडनेरा - 13, अमरावती - 10, तिवसा - 12, दर्यापूर - 11, मेळघाट - 7, अचलपूर - 8, मोर्शी - 7 उमेदवारांनी अर्ज दाखल केले.





**36 धामणगाव रेल्वे** विधानसभा मतदारसंघात विजय शामराव शेंडे - अपक्ष, मनिष वीरेंद्र जगताप, हर्षवर्धन बळीराम खोब्रागडे - बहुजन महा पार्टी, योगेंद्र एकनाथ पाटील - बहुजन समाज पार्टी, अभिलाषा चंद्रशेखर गजभिये - अपक्ष, विरेंद्र वाल्मिक जगताप - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, अमोल प्रभाकर बिरे - अपक्ष, संदिप कृष्णराव वाट - अपक्ष, सुभाष रामाजी भोयर - अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

**37 बडनेरा** विधानसभा मतदारसंघातून मुन्ना नारायणसिंग राठोड - अपक्ष, सुरज नारायण घरडे - अपक्ष, श्रीकांत बाबुराव फुलसावंदे - रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए), प्रशांत पंजाब जाधव - अपक्ष, उत्तम किसनराव तिरपुडे - पीपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटीक), नितीन बाबाराव कदम - अपक्ष, राहुल प्रकाश श्रृंगारे - अपक्ष, सुरेश पुंडलिक मेश्राम - अपक्ष, मंजुषा प्रशांत जाधव - अपक्ष, गिरीश हरिदास बारबुद्धे - अपक्ष, संजय देवरावजी महाजन - राष्ट्रीय समाज पक्ष, प्रीती संजय बंड - अपक्ष, सुनंदा जयराम अभ्यंकर - अपक्ष यांनी नामांकन अर्ज सादर केले.

**38 अमरावती** विधानसभा मतदारसंघात सैय्यद अबरार सैय्यद मजीद - प्रहर जनशक्ती पार्टी, जगदिश मोतीलाल गुप्ता - अपक्ष, पुरूषोत्तम किसन बागडी - अपक्ष, सुलताना परवीन मोहम्मद जाकीर - अपक्ष, मेराजुनिस्सा अब्दुल शकील - रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए), शेख युसुफ -अपक्ष, बबल हरिभाऊ रडके - अपक्ष, पाटील पप्पु उर्फ मंगेश मधुकरराव - महाराष्ट्र नवनिर्माण सेना, विजय माणिकराव ढाकुलकर - अपक्ष, अविनाश हरिशचंद्र धनवटे - पिपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटीक) यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

**39 तिवसा** विधानसभा मतदारसंघात विनोद किसन भालेराव - अपक्ष, शुभम विजय गजभिये - भारतीय युवा जन एकता पार्टी, दिनकर रामदास सुंदरकर - अपक्ष, राजीव बक्षी जामनेरकर - विकास इंडिया पार्टी, शिल्पा नरेंद्र कठाणे - जनवादी पार्टी, प्रवीण मारोतराव देशमुख - अपक्ष, युसुफ शा बिस्मिल्ला शा - अपक्ष, राजेश श्रीरामजी वानखडे - भारतीय जनता पक्ष, सुयश पांडुरंग श्रीखंडे - अपक्ष, अर्जुन सुखदेवराव युवनाते - अपक्ष, वासुदेव विठ्ठलराव कळसकर - अपक्ष, सुरज निरंजन लांडगे - आंबेडकरवादी रिपब्लिकन पार्टी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

**40 दर्यापूर** विधानसभा मतदारसंघात बबन महादेव विल्हेकर - अपक्ष, रमेश झिंगुजी अंभोरे- अपक्ष, राक्षसकर निलेश गजानन - अपक्ष, मनोहर अमृतराव चौथमल - अपक्ष, गजानन मोतीराम लवटे - शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), नागोराव वामन हंबर्डे - बहुजन समाज पार्टी, मनोहर कृष्णाजी कुऱ्हाडे -अपक्ष, रमेश गणपतराव बुंदिले - राष्ट्रीय युवा स्वाभिमान पार्टी, श्रीराम श्रावण नेहर -अपक्ष, कैलास उत्तमराव मोरे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (अ), रविकिरण देविदास तेलगोटे - अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

**41 मेळघाट** विधानसभा मतदारसंघात राजेश किसन दहीकर - अपक्ष, विपीन छोगालाल पटेल - अपक्ष, केवलराम तुळशीराम काळे - भारतीय जनता पार्टी, रामचरण माणिकराव चव्हाण - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, हेमंत नंदा चिमोटे - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राजकुमार दयाराम पटेल - प्रहर जनशक्ती पार्टी, प्रवीण रामू मावसकर - अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

**42 अचलपूर** विधानसभा मतदारसंघात ठाकूर प्रमोदसिंह जियालाल गड्रेल - अपक्ष, तमीज शाहा उमर शाहा - अपक्ष, गिरीधर नथ्थूजी रौराळे - अपक्ष, अक्षरा रूपेश लहाने - अपक्ष, रवि गुणवंत वानखडे - बहुजन समाज पार्टी, गौरव ओमप्रकाश किटुकले - अपक्ष, बच्चू कडू - प्रहर जनशक्ती पक्ष, रूकसाना सैय्यद निसार - अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

**43 मोर्शी** विधानसभा मतदारसंघात उमेश प्रल्हादराव शहाणे-अपक्ष, देवेंद्र महादेवराव भुयार -नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी, प्रमोद सुभाषराव कडू- अपक्ष, सुशिल सुरेशराव बेले - आझाद समाज पार्टी (कांशीराम), गिरीश रंगराव कराळे - नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी (श.प.), कमलनारायण जानराव उईके -बहुजन समाज पार्टी, महेंद्र उत्तमराव भातकुले - अपक्ष, यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

## दिवाली विथ माय भारत

**अमरावती -** 'दिवाळी विथ माय भारत' अंतर्गत मेरा युवा भारतच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त 27 ऑक्टोबर ते 30 ऑक्टोबरपर्यंत नेहरू युवा केंद्राच्या समन्वयाने बाजाराची स्वच्छता, वाहतुक नियम, वाहतुक व्यवस्थापन, दवाखान्यातील प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेची माहिती याबाबबत जनजागृती नेहरू युवा केंद्राचे, सरस्वती इन्स्टिट्युट ऑफ नर्सिंग आणि मातोश्री विमलाबाई देशमुख विद्यालयाचे स्वयंसेवक करणार आहेत.

# बंद घरातून रोख रक्कमेसह दागिने लंपास

**अमरावती -** नांदगावपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणार्या एका महिलेच्या घरातून चोराने रोख रक्कमेसह दागिने लंपास केले. ती महिला घराला कुलूप लावून मुलीसह गडचिरोलीला गेली होती. ती घरी परत आली असता तिला घराचे कुलूप तुटलेले दिसले व अज्ञात चोरट्यांनी कपाटातील 1 लाख 91 हजार 560 रुपये किमतीचे 40.900 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख 2500 रुपये असा एकूण 1 लाख 94 हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचे लक्षात आले. महिलेच्या तक्रारीवरून नांदगावपेठ पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढिल तपास नांदगाव पेठ पोलीस ठाण्याचे ठाणेदाराच्या मार्गदर्शनात पोलीस करीत आहे.

# पुन्हा गावाची वाट महागली

## खाजगी ट्रॅव्हल्सकडून प्रवाशांची लूट, बसचे भाडे झाले तिप्पट

महासागर प्रतिनिधी

**पथ्रोट ,(दि.28)-** विदर्भातील काही मंडळी पुणे, मुंबई, नाशीक, औरंगाबाद, गुजरात मधील सुरतसारख्या महानगरात रोजगारा निमीत्ताने स्थायीक झाले असता दिवाळी आपल्याच घरी साजरी करण्यासाठी चाकरमान्यांची लगबग सुरू आहे. गावाकडे पोहोचण्या करीता खिश्याला अव्वाच्या सव्वा खाजगी बस भाड्याने झळ पोहचते. सरकारने 2018 मध्ये प्रवाशांची खाजगी बसेसकडून होणारी लुटमार थांबविण्यासाठी अध्यादेश काढला होता. सरकारी बसभाड्याच्या फक्त दीडपट भाडे आकारण्याची मुभा शासनानं खाजगी



ट्रॅव्हल्सना दिली आहे. सरकारच्या परिवहन विभागाच्या नाकावर टिच्चून राज्यभरात प्रवाशांची लुट बिनबोभाटपणे सुरू आहे. पुणे-मूंबईपासून दूर असलेल्या विदर्भात ही लूट अधिक सुरू असल्याचे दिसुन येते. अनेक ठिकाणी परिवहन विभागाचं दरपत्रकच शासन निर्णयाला छेद देणारे असल्याचा आरोप होत आहे.

दिवाळी, गणपती, दसरा. अशी सण-उत्सव असले की प्रत्येकाला चाहूल लागते ती आपल्या गावाला जाण्याची परंतुया उत्सव काळातला प्रवास म्हणजे प्रत्येकासाठी दिव्य असाच असतो कारण, प्रचंड गर्दीमुळे गाड्यांमध्ये जागा मिळणं अशक्य. बस, रेल्वेच्या कन्फर्म तिकीटाची लॉटरी न लागलेल्या लोकांच्या खिशाला ते मिळविण्यासाठी कात्री लागली आहे. पुणे आणि मुंबईत राज्यभरातील अनेकजण नोकरी आणि व्यवसायासाठी स्थायिक झाले आहेत. पुणे-मुंबईतून विदर्भात दिवाळीसाठी येऊ पाहणाऱ्या चाकरमान्यांना सध्या खाजगी बसच्या तिकिटासाठी दुप्पट ते अडीचपट पैसे मोजावे लागत आहेत.

### सरकारी आदेश फक्त कागदापुरतेच

सरकारी बसेस आणि खाजगी बसेसची प्रवासभाड्याचं तुलनात्मक दरपत्रक प्रत्येक खाजगी बस वाहनतळाच्या ठिकाणी लावावं असे सरकारचे निर्देश आहेत. अनेक ठिकाणी खाजगी बस कंपन्यांकडून प्रवाशांची सुटका सुरू असतांना परिवहन विभाग मात्र कागदी घोडे नाचवतांना दिसते. सरकार शासननिर्णय हे लोकांसाठी काढतंय. मात्र, आपली यंत्रणा त्याची अंमलबजावणी कशी करते याचं मुल्यमापन करणारी सरकारी यंत्रणा पार तकलादू आणि कागदी घोडे नाचवणारी आहे. बिनबोभाटपणे जनतेचा खिसा कापणाऱ्या या प्रकाराला सरकार आळा घालणार का हाच खरा प्रश्न आहे.

# आज आ.सुलभा खोडके दाखल करणार नामांकन

## राष्ट्रवादी काँग्रेस( अजित पवार ) कडून उमेदवारी

### शक्तीप्रदर्शन करत निघणार रॅली

महासागर प्रतिनिधी

**अमरावती,(दि.28)-** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष(अजित पवार गट), भारतीय जनता पक्ष, शिवसेना (शिंदे गट), रिपाई(आठवले गट) सह इतर मित्रपक्ष मिळून तयार झालेल्या महायुतीच्या अमरावती मतदारसंघातील अधिकृत उमेदवार सुलभा संजय खोडके उद्या मंगळवारी 29 ऑक्टोबर रोजी आपला उमेदवारी अर्ज



दाखल करणार आहेत.

संत गाडगेबाबा समाधी मंदिरापासून सकाळी 10 वाजता दुचाकी रॅली काढून सुलभा खोडके आपल्या जनसमर्थनाचे शक्तीप्रदर्शन करणार आहे. त्यानंतर मोर्शी रोडवरील नविन उपविभागीय अधिकारी कार्यालयात अर्ज सादर केल्या जाईल. सुलभा खोडके या अमरावती मतदासंघाच्या विद्यमान आमदार असून त्यांनी पुन्हा एकदा निवडणू येण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. आयोजित रॅलीमध्ये जास्तीत जास्त अमरावतीकरांनी सहभाग घेण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून करण्यात आले आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# बच्चू कडूंच्या नामांकन रॅलीने भरली विरोधकांच्या छातीत धडकी

## हजारो कार्यकर्ते,दिव्यांग बांधव स्वयंस्फूर्तीने सहभागी | विजयी भव ने गुंजला अचलपूर परिसर

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, ( दि. 28 )** - अचलपूर विधानसभा मतदार संघातील परिवर्तन महाशक्ती या तिसऱ्या आघाडीचे अधिकृत उमेदवार व प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू यांनी सोमवारी हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत नामांकन दाखल केले.बच्चू कडू यांची आजची झालेली महारॅली विरोधकांच्या छातीत धडकी भरवणारी ठरली.कार्यकर्ते, शेतमजूर, शेतकरी,दिव्यांग बांधव,कामगारवर्गाने महारॅलीत स्वयंस्फूर्तीने सहभागी होऊन त्यांनी बच्चू कडू यांच्या विजयाचा संकल्प केला.

वसुबारस हा शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाचा दिवस आहे आज वसुबारस या दिनाचे औचित्य साधून बच्चू कडूंनी आपला आज नामांकन अर्ज सादर केला.सकाळीच बच्चू कडू यांनी आपल्या बेलोरा येथील निवासस्थानी आई वडिलांच्या प्रतिमेचे पूजन करून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. त्यांनतर घरून बैलबंडीमधून स्वत:च जोडी हाकत आईच्या समाधीस्थळी जाऊन नमन केले.त्याठिकाणी वृक्षपूजन करून परिसरातील राजमाता अहिल्या होळकर यांच्या पुतळ्याचे पूजन केले



तसेच सर्व संत महात्मे व महापुरुषांना अभिवादन केले. प्रत्येक निवडणुकीत नामांकन दाखल करतेवेळी आई सोबत असायची त्यांचा आशीर्वाद घेऊन आपण नामांकन दाखल करायला जायचो मात्र यावेळी आई सोबत नसल्याने बच्चू कडू भावुक झाले होते. आई बाबांनी दिलेली शिकवण आणि आशीर्वाद यामुळेच आज लाखो प्रहार कार्यकर्ते घडले आणि हेच कार्यकर्ते आज माझ्यासोबत माझा परिवार म्हणून उभे आहेत असा विश्वास देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला.

विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीस प्रारंभ झाला असून उमेदवार शक्तीप्रदर्शन करून नामांकन अर्ज दाखल करत आहे.एकीकडे उमेदवारांच्या रॅलीकरिता गर्दी जमविण्यासाठी कार्यकर्त्यांची वानवा असतांना सोमवारी बच्चू कडू यांच्या महारॅलीत मात्र जनसागर उलटला होता. अचलपूरमधील गांधीपूल याठिकाणी



सकाळपासून अचलपूर, चांदूरबाजार तालुक्यातील कार्यकर्ते,दिव्यांग बांधव, कामगार, शेतकरी, शेतमजूर वर्ग उपस्थित झाला होता. जणू आपणच या विधानसभा क्षेत्राचे उमेदवार आहोत याच अविर्भावात प्रत्येक कार्यकर्ता स्वयंस्फूर्तीने सहभागी झाला होता.

*महायुती आणि महाविकासआघाडी या दोघांचीही कार्यकर्त्यांवर निष्ठा राहीली नाही आणि कार्यकर्तेही पक्षांवर निष्ठा ठेवायचे बंद झाले आहेत. त्यामुळे यावेळी महायुती आणि महाविकासआघाडी यांच्यात बिघाडी होणार आहे. परिवर्तन महाशक्तीच्या माध्यमातून आम्ही जनतेला चांगला पर्याय देण्यासाठी निवडणुकीला सामोरे जात आहे. मतदारसंघात सर्वाधिक विकासनिधी खेचून आणल्याने तसेच शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग, महिलांचे आशीर्वाद पाठीशी असल्याने माझा पाचव्यांदा ऐतिहासिक विजय निश्चित होणार.*

**बच्चू कडू**

बच्चू कडू हे राज्यातील एक प्रभावी नेते असून मागील सलग विक्रमी चार वेळा ते या मतदारसंघातून अपक्ष निवडून आले आहेत. त्यांचा पक्ष सत्तेत असो किंवा नसो, परंतु राज्यातील शेतकरी, शेतमजूर, दिव्यांगबांधव, महिला, इत्यादींच्या प्रश्नांसाठी सरकारला धारेवर धरून त्यांना नये देण्याचा प्रयत्न केला आहे. सत्तेत सहभागी असतानाही पदाची तमा न बाळगता सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी थेट मुख्यमंर्त्याला भिडणारा नेता अशी त्यांची ओळख आहे. त्यांच्या रेट्यामुळेच देशात पहिल्यांदाच महाराष्ट्रात दिव्यांग विभागाची निर्मिती झाल्याने त्यांना दिव्यांगांचे मसीहा म्हणून ओळखले जाते. आपल्या हटके आंदोलनांसाठीही ते परिचित आहेत. शहरातील प्रमुख मार्गावरून बच्चू कडू यांची जीप मधून महारॅली निघाली.ठिकठिकाणी महिलांनी बच्चू कडू यांचे औक्षण करून त्यांना विजयी भव चा आशीर्वाद दिला.

नामांकन दाखल करतेवेळी शेतकऱ्याचे वाहन असलेल्या बैलबंडीमधून जाऊन त्यांनी त्यांनी नामांकन दाखल केले. यावेळी बल्लू जवंजाळ, प्रवीण पाटील, संजय तट्टे, राजेंद्र गोरले, हाजी रफिक शेठ, रहमान भाई, राजेंद्र येऊल, पुरुषोत्तमजी जाधव, प्रमोद ढेरे,अनिल पिंपळे, सतिश व्यास,संजय जैस्वाल, हरिचंद्र मुगल, बंटी काकरांनी, अंकुश जवंजाळ, मुझफ्फर हुसेन यांचे सह अचलपूर, चांदुर बाजार तालुक्यातील हजारो समर्थक, कार्यकर्ते उपस्थित होते.






# हसनापूर शेत शिवारात सापडला महिलेचा सांगाडा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती** - मागील 17 दिवसापासून घरून बेपत्ता असलेल्या महिलेचा कुजलेल्या अवस्थेत सांगाडा सापडल्याने एकच खळबळ उडाली आहे. ही घटना कुऱ्हा पोलीस स्टेशन हद्दीत हसनापूर शेत शिवारात उघडकीस आली. वंदना चरणदास ढोणे (वय 53, रा.बोर्डा हसनापूर) असे मृत महिलेचे नाव आहे.

माहितीनुसार सदर महिला 9 ऑक्टोबर रोजी गावाजवळीलच स्वत:च्या शेतात कामाला गेली होती. रात्री उशिरापर्यंत महिला घरी न आल्यामुळे कुटुंबीयांनी कुऱ्हा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. शुक्रवारी (दि.25) एका शेतापासून 35 ते 40 फूट अंतरावर कुजलेल्या अवस्थेत महिलेचा सांगाडा आढळून आला. हा सांगाडा विखुरलेल्या अवस्थेत होता तसेच आजूबाजूला साडीचे तुकडेही आढळून आले. त्या आधारेच मृत महिलेची ओळख पटली. दरम्यान महिलेचा मृत्यू हा शेतातील कुंपणात सोडलेल्या विद्युत प्रवाहने झाला असावा, असा अंदाज वर्तविला जात आहे. या घटनेचा तपास कुऱ्हा पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक करत आहे. पोलीस नातेवाईकांचे बयान देखील नोंदवत आहे.

# सावंगा विठोबा नगरीत 'दिपावली-अमावस्या' निमित्त 'चंदनउटी' आणि 'दीपोत्सव' कार्यक्रम

**रवि कलाने**

**चांदुर रेल्वे( दि.28 )** - तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा विठोबा येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे दि. 1 नोव्हेंबर 2024 शुक्रवारला दुपारी 12.00 वाजता संस्थानच्या वतीने अमावस्या निमित्त %चंदनऊटी-कार्यक्रम% आयोजित करण्यात आलेला आहे.रात्री 'दिपावली' निमित्त संस्थान मध्ये विश्वस्त मंडळाचे उपस्थित महाराजांची गाथा सह लक्ष्मीपूजन आणि दीपोत्सव साजरा करण्यात येत आहे.

दि.2 नोव्हेंबर 2024 शनिवार रोजी दुपारी 1 वाजता बलिप्रतिपदेला संस्थानचे



गोरक्षणमध्ये 'गायीगोंधन' निमित्त सर्व गायींना पुरणपोळी देवून पुष्पहार सह पूजन करून महाराजांची 'बजराम गाय माझी खरी' ही ओवी आणि 'आरती अकासवाणी' ही आरती म्हणून गौरक्षण कर्मचारी यांना शेला, टोपी, वस्त्रे, साडी व नारळ देवून संस्थानचे वतीने सत्कार करण्यात येणार आहे.

तसेच चंदनउटी नंतर बाहेर गावावरून येणारे भाविकांकरिता संस्थान तर्फे संस्थानचे अन्नदान समितीच्या नियोजनात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व भाविक- भक्तांनी तन-मन-धनाने सहकार्य करून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, अशी विनंती संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल सर्व विश्वस्त विनायक पाटील,वामन रामटेके, गोविंद राठोड,दिगांबर राठोड, अनिल बेलसरे, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, वैभव मानकर, स्वप्निल चौधरी विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

# आज मविआचे उमेदवार सुनील खराटे यांचे नामांकन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.28 )**- बडनेरा विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अधिकृत उमेदवार सुनील खराटे आपला नामांकन अर्ज उद्या मंगळवार दि. 29 ऑक्टोबर रोजी सकाळी 10 वाजता दाखल करणार आहेत.



महाविकास आघाडीमध्ये समाविष्ट सर्वच पक्षाच्या स्थानिक नेत्यांसह हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत सुनील खराटे शक्तिप्रदर्शन करणार आहे. नामांकन अर्ज दाखल करण्यापूर्वी सुनील खराटे यांच्या समर्थनार्थ साईनगर बेनाम चौक स्थित महेश भवन येथे शिवसेना नेते खा.अनिल देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच खा. बळवंत वानखडे, यशोमती ठाकूर, बबलू शेखावत विलास इंगोले ,माजी खा.अनंत गुढे, माजी आ. प्रदीप वडनेरे, शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख सुधीर सूर्यवंशी, महानगरप्रमुख पराग गुढधे, प्रा.डॉ. हेमंत देशमुख, अनिल जळमकर व काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व अन्य मित्रपक्षांचे वरिष्ठ पदाधिकारी यांच्या उपस्थितीत कार्यकर्ते व पदाधिकारी यांचा मेळावा पार पडेल व त्यानंतर तेथून दुचाकी रॅलीस प्रारंभ होईल. त्यानंतर सुनील खराटे हे प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत तहसील कार्यालय येथे नामांकन दाखल करतील.

# विजय नगरातील लाडक्या बहिणी बुजविताहेत रस्त्यावरील खड्डे

## डांबरी रस्ता सहा महिन्यातच उखळला | आ.देवेंद्र भुयारांच्या विकास कामाचा नमुना

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.28 )**- मागील पाच वर्षापासून आमदार असलेले देवेंद्र भुयार यांनी विकास कामाचा गवगवा करीत सप्टेंबर मध्ये झालेल्या अजित पवारांच्या जाहीर सभेत 4372 कोटी रुपयांमध्ये शहरासह मोर्शी मतदार संघाचा विकास केल्याचा आव आणला. परंतू त्यांनी या पैशातून नेमका कोणाचा विकास हे आता समोर येत आहे. शहरातील विजय नगरातील डांबरी रस्ता केवळ सहा महिन्यातच उखळला असल्यामुळे कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हा रस्ता उखळल्यामुळे आजूबाजूच्या नागरिकांना याचा



नाहक त्रास सहन करावा लागत आहे. अखेर नाईलाजास्तव बाजूच्या लाडक्या बहिणींनी स्वत: हातामध्ये घमेले पावडे घेऊन खड्डा बुजविण्याला सुरुवात केली आहे. मात्र निगरगट्ट प्रशासन या रस्त्याच्या निकृष्ट कामाबाबत काहीच कारवाई करताना दिसत नाही.

मोर्शी-वरुड मतदार संघामध्ये आतापर्यंत 'न भूतो न भविष्यती' असा विकास झाला असे आमदार देवेंद्र भुयार व त्यांचे कार्यकर्ते गावोगावी प्रचार करीत आहे. कुठल्याही लोकप्रतिनिधीने एवढा निधी आणला नाही, तेवढा निधी आपण आणला असल्याचा दावा देवेंद्र भुयार करित आहेत. या निधीचा उपयोग रस्ता नाल्या व इतर बांधकामे करण्याकरिता झाला असल्याचे ते सांगतात. परंतु ही बांधकामे करत असताना यामध्ये किती भ्रष्टाचार झाला, याचा गवगवा करण्याचे ते विसरतात. याची साधी चौकशी सुद्धा प्रशासनाने केली नसावी, म्हणूनच की काय विजयनगर मधील उखळलेला रस्ता हे त्याचे उदाहरण आहे. असे कितीतरी कामे निकृष्ट दर्जाचे झाले असावे, हे या रस्त्याच्या उखळलेल्या कामावरून दिसून येत आहे. लाखो, कोट्यवधी रुपये खर्च करून ही बांधकामे करण्यात येतात, परंतु ही बांधकामे करीत असताना यातून मिळणारा मलिदा हे लोकप्रतिनिधी तथा नोकरशाह खात असल्यामुळे असले रस्ते असले बांधकामे होत असल्याचा आरोप जनतेकडून केल्या जात आहे. तालुक्यातील अशा कामांची गुणवत्ता तपासणी होणे गरजेचे झाले आहे. ज्या कंत्राटदारांनी ही कामे केली त्यांना ब्लॅक लिस्ट करुन त्यांच्यावर आर्थिक वसुली काढण्याची मागणी मतदारसंघातील नागरिक करित आहेत.

# हिवरखेडच्या डॉक्टरांचे अहिल्यानगरात अपघाती निधन

## ट्रॅव्हल्स व बुलेरोमध्ये झाली धडक

**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड, ( दि.28 )**- येथील व्हेटर्नरी डॉक्टरांचा अहिल्या नगर येथे ट्रॅव्हल्स व बुलेरोच्या धडकेत मृत्यू झाला. या घटनेमुळे हिवरखेड गावावर शोककळा पसरली आहे.

डॉ.सुखदेव बिंदूजी नागले (वय 40 रा.हिवरखेड)यांचे दि.26



ऑक्टोबर 2024 रोजी शनिवारी ला रात्री 11 वाजता अपघाती निधन झाले. संभाजी नगर वरुन आपले कर्तव्य पार पाडून ते अहिल्या नगर येथे परत येत असताना अपघात झाला. एमएच 19/सीएक्स 7555 क्रमांकाच्या ट्रॅव्हल्स त्याच्या एमएच 16/ डीसी 6268 क्रमांकाच्या महिंद्रा बुलेरो वाहनाला जबर धडक दिल्याने डॉ.नागले यामध्ये जखमी होवून ते जागीच गतप्राण झाले. ते बारामती अॅग्रो प्रायव्हेट लिमिटेड कंपनी मध्ये व्हेटर्नरी डॉक्टर होते. अहिल्या नगर वरुन त्यांचे पार्थीव हिवरखेड या गावी आणल्यावर त्यांचेवर निर्मिक स्मशानभूमी हिवरखेड येथे रविवारी दि.27 ऑक्टोबर 2024 रोजी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुली आणि चार भावंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.


# 'रांगोळी' धार्मिक आणि सांस्कृतिक प्रथा

## रांगोळी 'अशुभ' शक्तींना घराचा उंबरठा ओलांडु देत नाही

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट, ( दि.28 )**- दिवाळीतील पाच दिवस प्रत्येकाच्या घरात सजावट करण्यात येते. या दिवसांत घरात चैतन्याचे व उत्साहाचे वातावरण असते. दिवाळीच्या दिवसांत घरासमोर दिवे लावले जातात. तर, महिला छान रांगोळ्या काढतात. दारासमोर छान रांगोळी काढली जाते. रांगोळीत सुबक रंग मन प्रसन्न करतात. खरं तर पूर्वी दररोज घरासमोर रांगोळी काढली जायची. मात्र, हल्ली ती परंपरा मागे पडत चालली आहे. पण अजूनही दसरा, दिवाळीच्या दिवसांत रांगोळी काढली जाते.

संस्कार भारती, ठिपक्यांची रांगोळी असे अनेक प्रकार आहेत. दारासमोर रांगोळी दिसायला तर सुबक दिसतेच मात्र घरासमोर रांगोळी काढण्याचे इतर अनेकही फायदे आहेत. रांगोळी काढण्यामागे प्राचीन परंपरा असून त्याला काही धार्मिक आणि ऐतिहासिक कारणे आहेत. रांगोळीची परंपरा मोहेंजोदाडो आणि हडप्पा संस्कृतीपासून सुरू असल्याचा उल्लेख सापडतो. संस्कृत भाषेत



रांगोळीला %रंगवल्ली% असे म्हटले जाते. रंगाद्वारे भावना व्यक्त करणे असा या शब्दाचा अर्थ होतो.

प्राचीन काळात लोकांचा असा विश्वास होता की कलात्मक चित्रांमुळं शहरं आणि गाव धनधान्याने समृद्ध राहतात तसेच वाईट शक्तींच्या प्रभावापासून सुरक्षित राहतात. याच दृष्टीकोनातून 'रांगोळी' धार्मिक आणि सांस्कृतिक समारंभाच्या वेळी काढण्याची प्रथा सुरू झाली.

असं म्हणतात की रांगोळी घरात येणाऱ्या 'अशुभ' शक्तींना घराचा उंबरठा ओलांडू देत नाही. रांगोळी काढण्यासाठी आपण खाली जमिनीवर बसतो. त्यामुळं गुडघ्यांची हालचाल होते. सकाळी सकाळी आपोआपच गुडघ्यांचाही व्यायाम होतो. रांगोळीसाठी आपण हाताच्या बोटांचे समोरचे टोक वापरतो. बोटाच्या समोरच्या टोकांची आपण जितकी हालचाल करतो तितकाच मेंदू अधिक विकसित होतो, असं म्हटलं जातं.

### अशी बनती रांगोळी

रांगोळी एका विशिष्ट्य खडकापासून तयार केली जाते. या खडकाचे नाव 'डोलोमाइट' असं आहे. सर्वप्रथम हा दगड भट्टीत भाजून, बारीक कुटून मग वस्त्रगाळ करून वा चाळून काढतात. पांढऱ्या रांगोळीला वेगवेगळ्या प्रकारचे रंग देऊन रंगीत रांगोळी तयार केली जाते.


### जाहिर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी व माझे पक्षकार नामे 'रामु दयारामजी मोटे' यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे, मिळकतीचे वर्णन -मौजे गणेशपूर, शेत सर्वे क्रं. 18, गट क्रं. 44, प्लॉट क्रं. V- A, ता. दर्यापूर, जिल्हा. अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार 'रामु दयारामजी मोटे% यांच्या मालकीचे आहे. तदनंतर, त्यांनी VASTU HOUSING FINANCE CORPORATION LTD. येथे गृह कर्जाकरीता अर्ज केला असता वरील वर्णनाचे मूळ खरेदीखत दि. 25/02/2010 रोजीचे दस्त क्र. 336 आणि खरेदीखत दि. 14/08/2013 रोजीचे दस्त क्र. 2160 सदर दस्त गहाळ झालेले आहे. तसेच वरील नमूद दस्त कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान/राष्ट्रीयकृत/ खाजगी//पतसंस्था/ सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमतेवीषयी शासकीय-नीमशासकीय इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली देलेल्या माझ्या मोबाइल क्रं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

आपला
Advocate
रवींद्र र वाटाणे
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती
मो. नं. 9823698745